# जिल्हा परिषद गोंदिया

शिक्षण विभाग (प्राथमिक)

## प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण (PM-POSHAN) योजना

## डाटा एन्ट्री ऑपरेटर पदाकरीता अर्ज - 2023

**अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक** ...................                **दिनांक** :- .......................

**प्रति,**

सदस्य सचिव,
जिल्हा निवड प्रक्रिया समिती,
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, गोंदिया.

उमेदवाराचा अलिकडच्या काळातील पासपोर्ट साइज फोटो

**विषय : प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना.**
**डाटा एन्ट्री ऑपरेटर पदाकरीता अर्ज.**

❖ **उमेदवाराचे तपशिल** :-

1) उमेदवाराचे नाव : श्री / श्रीमती ------------------------------------------------------------------------------------

(आडनाव) (स्वत:चे नाव) (वडील/पतीचे नाव)

2) पत्रव्यवहाराचा पत्ता : ------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------

3) जन्म तारीख (शालांत प्रमाणपत्रानुसार) : / /

4) जातीचा प्रवर्ग : --------------------- जात : -------------------

5) E-mail ID : -----------------------------------------------------

6) भ्रमणध्वनी क्र. : ---------------------

7) वय (31 जुलै, 2023 रोजी) : -----------वर्ष -----------महिने -----------दिवस

8) **अर्जदाराची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता** :

| अ.क्र. | परीक्षेचे नाव | परीक्षा मंडळ/ विद्यापिठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | गुणांची टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | इयत्ता 10 वी | | | | |
| 2 | इयत्ता 12 वी | | | | |
| 3 | पदवी | | | | |
| 4 | मराठी टंकलेखन-30 | | | | |
| 5 | इंग्रजी टंकलेखन-40 | | | | |
| 6 | MS-CIT / तत्सम परीक्षा उत्तीर्ण | | | | |

9) **अर्जासोबत सादर करावयाचे प्रमाणपत्राच्या सांक्षाकित प्रती * (आवश्यक)** :

| अ.क्र. | **सादर करावयाचे प्रमाणपत्राच्या सांक्षाकित प्रती** | |
|---|---|---|
| 1 | इयत्ता 10 वी च्या गुणपत्रीकेची छायांकित प्रत | |
| 2 | इयत्ता 12 वी च्या गुणपत्रीकेची छायांकित प्रत | |
| 3 | पदवी गुणपत्रीकेची छायांकित प्रत | |
| 4 | मराठी टंकलेखन-30 गुणपत्रीकेची छायांकित प्रत | |
| 5 | इंग्रजी टंकलेखन-40 गुणपत्रीकेची छायांकित प्रत | |
| 6 | MS-CIT / तत्सम परीक्षा गुणपत्रीकेची छायांकित प्रत | |
| 7 | जात प्रमाणपत्रची छायांकित प्रत (Caste Certificate) | |
| 8 | जात वैधता प्रमाणपत्रची छायांकित प्रत (Caste Validity) | |
| 9 | वैध असलेले नॉन क्रिमेलियर प्रमाणपत्राची छायांकित प्रत | |
| 10 | अधिवास प्रमाणपत्रची छायांकित प्रत (Domicile Certificate) | |

---

# प्रतिज्ञापत्र

प्रमाणित करतो / करते की, सदर अर्जा सादर केलेली माहिती खरी आहे. सदर माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास माझी निवड रद्द करण्यात यावी. त्यास माझी कोणतीही हरकत नाही.

दिनांक : / /

स्थळ : ------------------

**(उमेदवाराची स्वाक्षरी व नाव)**

---

*****

# जिल्हा परिषद गोंदिया

शिक्षण विभाग (प्राथमिक)

## प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण (PM-POSHAN) योजना

## कंत्राटी डाटा एन्ट्री ऑपरेटर पदाकरीता जाहिरात - 2023

-----------------------------------------------------------------------------------------------------------

जाहिरात क्रमांक : ------------------ दिनांक : / /

-----------------------------------------------------------------------------------------------------------

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण (PM-POSHAN) योजना, शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत जिल्हा स्तरावरील व पंचायत समिती स्तरावरील रिक्त असणारी डाटा एन्ट्री ऑपरेटर्सची पदे तात्पुरत्या स्वरुपात पुढील 11 महिन्याच्या कालावाधीकरीता कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर भरण्यात येणारी रिक्त पदांची स्थिती खालीलप्रमाणे :-

1) **आरक्षण** : **एकूण 6 पदे**

| प्रवर्ग | अनु. जा. | अ. ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | इ.मा.व. | अराखिव (खुला) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | ०१ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०१ | ०२ | ०० | ०६ |

2) **मासिक एकत्रित पारिश्रमिक (मानधन)** :- **रु.20,650/-**
(शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक2022/प्र.क्र.40/एस.डी.3, दि.01 जुन, 2022 नुसार देय राहिल.)

3) **शैक्षणिक व व्यावसायिक अहर्ता** :-
अ) किमान इयत्ता 12 वी पास
ब) मराठी टायपिंग-30 श.प्र.मि.
क) इंग्रजी टायपिंग-40 श.प्र.मि.
ड) MS-CIT किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे.

4) **वयोमर्यादा** :- दि.31 जुलै, 2023 रोजी सदर पदासाठी उमेदवाराची किमान वय 18 वर्षे कमाल वय 43 वर्षे असणे बंधनकारक आहे.

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | **किमान वय** | **कमाल वय** | |
|---|---|---|---|
| | अराखिव/अमागास/आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | अराखिव (खुला) | अनु.जा./अ.ज./वि.जा. (अ)/भ.ज. (ब)/भ.ज. (क)/भ.ज. (ड)/वि.मा.प्र./ आ.दु.घ./इ.मा.व./अराखिव (खुला) |
| 31 जुलै, 2023 | 18 | 38 | 43 |

5) **अर्जदार हा संबंधित पदासाठी शरिरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा**.

6) **निवड पध्दती** :-

महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा निर्णय क्रमांक शापोआ/2019/प्र.क्र.74/एस.डी.-3, दि.29 ऑक्टोंबर, 2020 अन्वये खालील प्रमाणे निवड पध्दती.

अ) डाटा एन्ट्री ऑपरेटर्स पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास इयत्ता 10 वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी आणि इय्यता 12 वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी यांची सरासरी काढण्यात येईल. तसेच एखादा उमेदवार पदवीधर असल्यास त्याला 10 गुण बोनस देण्यात येतील.

ब) अनुक्रमांक "अ" मध्ये विशद केल्याप्रमाणे गुणांकन करुन उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादीतील उमेदवारांना संगणक परीक्षेकरीता एक पदासाठी गुणानुक्रमे 12 (1:12) या अनुपातानुसार उमेदवार बोलावण्यात येतील. सदर उमेदवारांची मराठी टायपिंग-30 श.प्र.मि. व इंग्रजी टायपिंग-40 श.प्र.मि. आणि संगणक ज्ञानाची परीक्षा घेण्यात येईल. यासाठी सर्व मिळून 100 गुण देण्यात येतील. सदर प्रात्याक्षित परीक्षेमध्ये किमान 50 गुण प्राप्त करणारे उमेदवार "डाटा एन्ट्री ऑपरेटर" च्या पदावरील निवडीसाठी पात्र राहतील.

क) उमेदवारास संगणक परीक्षेमध्ये मिळालेले गुण (100 पैकी) व अनु.क्र. "अ" प्रमाणे शैक्षणिक पात्रतेबाबत मिळालेल्या गुणांची बेरीज करुन एकूण गुण देण्यात येतील व यानुसार उमेदवारांची निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. त्याप्रमाणे तेवढयाच पुढील उमेदवारांची प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येईल.

ड) सदर पदासाठी **मुलाखत** घेण्यात येणार नाही.

7) **उमेदवारांसाठी सुचना** :-

7.1) उमेदवारांनी विहित नमुन्यात अलीकडच्या काळातील सांक्षाकित पासपोर्ट साईज फोटोसह अर्ज सादर करावा. सदर अर्जाच्या पाकिटावर **"कंत्राटी डाटा एन्ट्री ऑपरेटर पदाकरीता अर्ज** असे नमूद करावे. उमेदवाराने अर्ज सदस्य सचिव तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, गोंदिया यांचे कार्यालयातील **"प्रधान मंत्री पोषण आहार (PM-POSHAN) कक्ष"** मध्ये समक्ष किंवा अंतिम दिनांकाच्या पुर्वी पोस्टाने सुट्टीचे दिवस वगळून सादर करावे.

7.2) **परीक्षा शुल्क** :- उमेदवारांनी अर्जासोबत परीक्षा शुल्क म्हणून रक्कम रु.500/- चा धनाकर्ष (Demand Draft) Mid Day Meal Scheme, Education Officer (Primary), Z P Gondia यांच्या नावाने राष्ट्रीयकृत बँकेचेच धनाकर्ष (Demand Draft) अर्जासोबत जोडावे.

7.3) अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक पात्रता, वय प्रमाणपत्र, प्रवर्ग निहाय जातीचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, संदर्भातील कागदपत्रांचा झेरॉक्स प्रती स्व स्वाक्षांकित (self attested) करुन जोडाव्यात.

7.4) निवड झालेल्या उमेदवारांना प्रवर्ग निहाय 6 महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity) सादर करणे बंधनकारक राहिल.

7.5) वैध असलेले नॉन क्रिमेलियर प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर करणे बंधनकारक राहिल.

7.6) **अर्ज करण्याची अंतिम तारीख 16/06/2023 असेल**. यांनतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

7.7) उमेदवारांचा नियुक्ती कालावधी 11 महिन्याचा राहिल व 11 महिन्यानंतर उमेदवाराचे काम समाधानकारक असल्यास नियमानुसार एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून पुनर्नियुक्ती देण्यात येईल.

7.8) नियुक्ती पुर्वी उमेदवाराकडून शासनाकडील विहित नमुन्यात रु.100/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा (बंधपत्र) करुन घेण्यात येईल. त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वतंत्रपणे सादर करावे लागेल. कंत्राटी पध्दतीने नियुक्ती केलेल्या डाटा एन्ट्री ऑपरेटर या पदासंबंधी सेवा शर्ती, शैक्षणिक अर्हता, एकत्रित ठोक मानधन व नियुक्तीची कार्यपध्दती यासंबंधी आवश्यक ते बदल तसेच निर्णय घेण्याचे अधिकार शासनास राहतील.

7.9) भरती प्रक्रियेबाबत तसेच उमेदवार पात्र व अपात्रता बाबतचा अंतिम निर्णय हा निवड प्रक्रिया समितीचा राहिल.

7.10) कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची सेवा करारपत्रात नमूद केलेल्या कालावधीनंतर आपोआप संपुष्टात येईल.

7.11) डेटा एन्ट्री ऑपरेटर म्हणून नियुक्त केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांस नियमित सेवेचे कोणतेही लाभ मिळणार नाही.

7.12) परिपूर्ण अर्ज सादर करण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहिल. अपूर्ण माहिती असलेले कोणतेही अर्ज. आवश्यक कागदपत्र, अर्ज स्विकारले जाणार नाही.

7.13) परीक्षेच्या वेळी येतांना आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स (Smart Card पध्दतीचे) यापैकी किमान 1 मुळ ओळखपत्र व छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

7.14) पात्र उमेदवारांची संगणक प्रात्याक्षिक व मराठी व इंग्रजी टंकलेखन परीक्षा ही संगणकीय प्रणाली मार्फत घेण्यात येईल.

7.15) सदर भरतीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर 1 (एक) वर्षाच्या आत एखाद्या ठिकाणी कंत्राटी कर्मचारी यांनी राजीनामा दिल्याने पद रिक्त झाल्यास प्रतिक्षाधिन यादीवरील गुणानुक्रमे उमेदवारास नियुक्ती आदेश दिला जाईल. प्रतिक्षाधिन यादी 1 (एक) वर्षासाठी ग्राहय धरण्यात येईल.

7.16) सदर परीक्षेस बसण्यासाठी पात्र उमेदवारांची यादी जिल्हा परिषदेच्या https://zpgondia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

7.17) भरती संबंधित नविन सुचना, परीक्षेचा दिनांक, वेळ व स्थळ, सदर परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची गुणानुक्रमे यादी याबाबत माहिती जिल्हा परिषदेच्या https://zpgondia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. व्यक्तिश: अर्जदाराला संपर्क केला जाणार नाही. अर्जदाराने वेळोवेळी संकेतस्थळावर भेट देणे आवश्यक आहे.

सदस्य सचिव
जिल्हा निवड प्रक्रिया समिती
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, गोंदिया

मा. अध्यक्ष
जिल्हा निवड प्रक्रिया समिती
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गोंदिया